CorelDRAW Ps Ai Id
पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

अधिक मास अधिक खास
चांदीच्या जोडवी मजुरीवर 100% सूट
ऑफर कालावधी - १७ मे ते १५ जून २०२६
काळे ज्वेलर्स
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १३५ । किंमत - २ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । ०५/०६/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# अतिक्रमणमुक्त संगमनेर शहराचा संकल्प, मात्र मार्ग खडतर

## कारवाईवरून शहरात राजकीय - सामाजिक वाद; कारवाईत भेदभाव नको

संगमनेर (संजय आहिरे)

संगमनेर शहर अतिक्रमणमुक्त करून वाहतूककोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याचा निर्धार नगरपरिषद प्रशासनाने केला असून या पार्श्वभूमीवर शहरातील विविध रस्त्यांवरील भाजी विक्रेते व इतर अतिक्रमणधारकांवर कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली आहे. मात्र या कारवाईला काही व्यापारी व भाजी विक्रेत्यांचा विरोध होत असल्याने अतिक्रमणाचा मुद्दा सध्या शहरात चांगलाच गाजू लागला आहे.

सेवा समितीचे प्रमुख आमदार सत्यजित तांबे यांनी शहरातील रस्ते आणि पदपथ केवळ वाहतुकीसाठी मोकळे ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. रस्त्यांवरील छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना पर्यायी जागा उपलब्ध करून देत त्यांचे पुनर्वसन करण्याचा पालिकेचा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे. त्याचबरोबर शहर स्वच्छ, सुरक्षित आणि शिस्तबद्ध ठेवण्यासाठी नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे याही पुढाकार घेत असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात येत आहे.

या धोरणानुसार अकोले बायपास परिसरातील पेटीट विद्यालयाजवळील भाजी विक्रेत्यांचे पुनर्वसन मेडीकव्हर हॉस्पिटलसमोरील जागेत करण्यात आले आहे. तसेच मालदाड रोडवरील भाजी विक्रेत्यांना महावितरण कंपनीच्या मोकळ्या जागेत स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र अनेक विक्रेत्यांनी या पुनर्वसनाला विरोध दर्शविला असून व्यवसायावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली आहे.







दरम्यान, या कारवाईवरून विरोधकांनीही नगरपरिषद प्रशासनावर टीकेची झोड उठविली आहे. शहरातील काही भागांमध्ये अतिक्रमण हटविले जात असताना इतर अनेक प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप केला जात आहे.

विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते ज्ञानमाता विद्यालय मार्ग तसेच जोर्वे नाका परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण असल्याचा दावा विरोधकांनी केला आहे. पालिकेला ही अतिक्रमणे दिसत नाहीत का? केवळ एका भागातील अतिक्रमण हटवून शहराचा विकास होणार नाही. प्रशासनाने भेदभाव न करता सर्वच भागांतील अतिक्रमणे हटविण्याची हिम्मत दाखवावी, असा सवाल स्थानिक नागरिक आणि अतिक्रमणधारकांकडून उपस्थित केला जात आहे. एका बाजूला शहरातील अनेक रस्ते अतिक्रमणाच्या विळख्यात अडकले असून वाहतूक आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ही गंभीर समस्या बनली आहे. त्यामुळे रस्ते मोकळे करण्यासाठी पालिका विविध उपाययोजना राबवत आहे. मात्र दुसरीकडे काही घटक या मोहिमेला विरोध करत असून काहीजण प्रशासनाच्या भूमिकेतील विसंगतींकडे बोट दाखवत आहेत.

अतिक्रमण हटविण्याची मोहीम ही शहराच्या विकासासाठी आवश्यक असल्याचे मत एका गटाकडून व्यक्त होत असताना सर्वांसाठी समान निकष लागू करूनच कारवाई व्हावी, अशी मागणी दुसऱ्या गटाकडून होत आहे. परिणामी संगमनेरमधील अतिक्रमणाचा प्रश्न आता केवळ प्रशासकीय न राहता सामाजिक आणि राजकीय चर्चेचा विषय बनला आहे.

आता नगरपरिषद प्रशासन शहरातील सर्वच भागांमध्ये एकसमान आणि निर्भीड कारवाई करते की नाही, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### नागरीकांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा

संगमनेर नगरपरिषदेने शहरातील रस्त्यांवरील फेरीवाल्यांच्या पुनर्वसनाचे आणि रस्ते फेरीवाले मुक्त करण्याचे धोरण हाती घेतले आहे. त्यानुसार शहरातील सर्वच भागात टप्प्याटप्प्याने ही कारवाई सुरू राहणार आहे. पेटीत विद्यालय जवळील ३२ भाजी विक्रेत्यांचे पुनर्वसन मेडीकव्हर हॉस्पिटलसमोर करण्यात आले असून तेथे शेड बांधून दिले आहे, लवकर तेथील गटारीवल ढाबे टाकण्यात येणार आहे. तसेच नवीन नगर रोड येथे पालिका जागा विकत घेऊन तेथे फेरीवाल्यांचे पुनर्वसन करणार आहे. सय्यद बाबा चौक येथील मटन मार्केट हटवून तेथे देखील व्यापाऱ्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. पालिका अतिक्रमण काढताना किंवा फेरीवाले मुक्त शहर करताना कुठलाही भेदभाव करत नाही, करणार नाही. त्यामुळे नागरिकांनी पालिकेला सहकार्य करावे, सकारात्मक प्रतिसाद द्यावा.



**दयानंद गोरे**
मुख्याधिकारी
संगमनेर नगरपरिषद

# भंडारदरा धरणाने गाठला तळ, नियोजन गरजेचे



युवावार्ता (प्रतिनिधी)

भंडारदरा - अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख समजल्या जाणाऱ्या धरणापैकी भंडारदरा धरणाचा पाणीसाठा अवघा २४.११ टक्के झाला असून भंडारदरा परिसरामध्ये मंगळवारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील भंडारदराचे धरण हे प्रमुख धरण समजले जाते. महाराष्ट्रामध्ये सर्वच ठिकाणी धरणाची पाण्याची परिस्थिती गंभीर असताना भंडारदरा धरण याला अपवाद राहिलेले नाही. भंडारदरा धरणामध्ये अवघे २४ टक्के पाणी शिल्लक राहिले आहे. बुधवारी सकाळी भंडारदरा धरणाचा पाणीसाठा २६६२ दलघफु झाला असून मागील वर्षीही याच तारखेला भंडारदरा धरणाचा पाणीसाठा हा २६६२ एवढाच होता. भंडारदरा धरणाच्या वीज निर्माण केंद्रामधून प्रवरा नदीमध्ये ७७० क्युसेकने पाणी सोडले जात आहे त्यामुळे धरणामध्ये पाणीसाठा हा आणखी कमी होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. भंडारदरा धरणामध्ये मंगळवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे पाण्याची स्थिती आहेत त्याच परिस्थितीमध्ये असून कोणत्याही प्रकारची नवीन पाण्याची आवक झाली नसल्याची माहिती भंडारदरा धरण शाखेचे शाखाधिकारी सागर ढोकणे यांनी दिली आहे मंगळवारी भंडारदरा धरणाच्या परिसरामध्ये अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली असून सादर झालेल्या पावसामुळे टेन्ट धारकांची तारांबळ उडाली भंडारदरा परिसरामध्ये अचानक वादळी वाऱ्यासह मंगळवारी चार वाजेच्या दरम्यान रतनवाडी, घाटघर, पांजरे, मुतखेल, कोलटेंबे, शेंडी, चिचोंडी परिसरात जोरदार

पाऊस कोसळला. सदर कोसळलेल्या पावसामुळे वातावरणामध्ये गारवा तयार झाल्याने काजवा प्रेमींसाठी अनोखी अशी संधी मिळणार असून काजव्यांच्या संख्येमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ होण्यास मदत मिळणार आहे. गत २४ तासांमध्ये भंडारदरा येथे २ मी मी., घाटघर, ५ मी मी., पांजरे ८ मी मी तर रतनवाडी येथे १३ मी मी पाऊस कोसळला.

# प्राजक्त तनपुरे बिनविरोध आमदार




युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग जवळपास मोकळा झाल्याचे चित्र दिसत आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेत नगराध्यक्ष करण ससाणे आणि मच्छिंद्र धुमाळ यांनी आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतले आहे. उर्वरित उमेदवार कमलेश गांधी आणि दत्तात्रय पानसरे यांची मनधरणी सुरू असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. करण ससाणे यांनी अर्ज मागे घेतल्यानंतर निवडणूक जवळपास एकतर्फी झाल्याचे मानले जात आहे. उर्वरित दोन्ही उमेदवारांनीही माघार घेतल्यास अहिल्यानगर जिल्ह्यातून प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड निश्चित होईल. त्यामुळे विधान परिषदेत अहिल्यानगरचे खाते प्राजक्त तनपुरे यांच्या रूपाने उघडले जाण्याची शक्यता अधिक बळावली आहे.

या निवडणुकीसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यावर अहिल्यानगर जागेची जबाबदारी सोपविली होती. स्थानिक पातळीवरील समन्वय साधत त्यांनी संभाव्य बंडखोरी टाळण्यात यश मिळविल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे भाजप आणि महायुतीसाठी ही जागा बिनविरोध मिळविण्याचा प्रयत्न अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे दिसत आहे. राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आता सर्वांचे लक्ष उर्वरित उमेदवारांच्या निर्णयाकडे लागले असून, प्राजक्त तनपुरे यांच्या अंगावर बिनविरोध विजयाचा गुलाल उधळला जाणार का, याचा अंतिम फैसला अर्ज माघारीच्या प्रक्रियेनंतर स्पष्ट होणार आहे.

प्राजक्त तनपुरे होणार दुसऱ्यांदा आमदार व राहुरीला मिळाणार दोन आमदार.







Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532 24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# तेल संकटाची तीव्रता वाढली

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

इराण आणि अमेरिकेच्या युद्धात तेलाच्या मोठे संकट आहे. होर्मुज खाडी बंद आहे. भारत जवळपास तेल आयात करतो. आखाती देशातील तेल रिफायनरीवरही हल्ले झाले. ज्यामुळे अनेक तेल रिफायनरीने उत्पादन थांबवले किंवा कमी केले. शिवाय जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे भाव सातत्याने वाढत आहेत. होर्मुज खाडी बंद असल्याने भारताचे अनेक जहाज होर्मुजमध्येच अडकली आहेत. पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत वाढ होत आहे. अवघ्या काही दिवसांमध्ये तब्बल ४ वेळा पेट्रोल, डिझेलच्या किमतीमध्ये मोठी वाढ झाली. केंद्र सरकारकडून एका मागून एक असे मोठे निर्णय घेतले जात आहेत. ज्याचा परिणाम सर्वसामान्य नागरिक आणि कंपन्यांवर होत आहे. गेल्या दोन महिन्यात देशात मोठ्या प्रमाणात महागाई वाढली. इराण आणि अमेरिका युद्धाचा मोठा परिणाम भारतात बघायला मिळत आहे.दिल्लीमध्ये महत्वाची बैठक केंद्रीय मंत्रिमंडळाची झाली. यादरम्यानच आता केंद्र सरकारने तेलाच्या संकटात मोठा निर्णय घेतला. मोदी सरकारने थेट मोठा निर्णय घेत १० लाख कोटी रूपयांचा निधी जारी केला आहे. ही अत्यंत मोठी घोषणा म्हणावी लागणार आहे. कच्च्या तेलाच्या समस्येतून मार्ग काढण्याकरिता या निधीची घोषणा करण्यात आली.

हे सुद्धा वाचासरकारकडून अत्यंत मोठ्या निधीची घोषणा करण्यात आली. तेलाच्या समस्येतून मार्ग काढण्याकरिता विविध निर्णय केंद्र सरकारकडून घेतले जात आहेत. त्यामध्येच ही अत्यंत मोठी घोषणा केली. यापूर्वी अनेक देशांच्या दौऱ्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी गेले होते. त्यांनी तेलासंदर्भात काही मोठे करार देखील केले. युद्धाच्या स्थितीमध्ये जगभरात कच्च्या तेलाची तुटवडा निर्माण झाला.

# अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर तडीपारीची कारवाई

## प्रांताधिकारी उंडे यांची कठोर भूमिका



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - ज्या गावात दारूची समस्या आहे, त्या प्रत्येक गावाचा आढावा घेऊन पोलीस प्रशासन व उत्पादन शुल्क यांनी त्या गावात काय कारवाई केली याची विचारणा करत ज्या परमिट दुकानातून अवैध दारू येते. त्या दुकानांवरही पोलिसांनी अहवाल दिल्यावर उत्पादन शुल्क विभागाने कारवाईची शिफारस करावी, असे प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी आदेश दिले. तसेच सतत अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर तडीपारीची कारवाई केली जाईल, अशी भूमिका प्रांताधिकारी यांनी मांडत गावातील ग्रामसुरक्षा दल सक्रिय करण्यासाठी गावातील सरपंच यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. अवैध दारू विरोधात आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या सूचनेनुसार महसूल विभाग, पोलीस विभाग, पोलीस पाटील व सामाजिक कार्यकर्ते यांची बैठक पार पडली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रांताधिकारी अरुण उंडे होते. या बैठकीला विभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे, उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी ऋषिकेश इंगळे, सावखेडकर, तहसीलदार सिद्धार्थ मोरे, अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, राजुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. पवार, दारूबंदी समितीचे कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी व जिल्हाधिकारी दारूबंदी समितीचे सदस्य मच्छिंद्र देशमुख यांच्यासह तालुक्यातील ज्या गावांमध्ये अवैध दारूची समस्या आहे अशा सर्व गावांचे पोलीस पाटील उपस्थित होते. हेरंब कुलकर्णी यांनी संगमनेरच्या ज्या दुकानांमधून दररोज अवैध दारू येते, त्या गाड्या पोलीस व उत्पादन शुल्क पकडत नाही, अशी तक्रार केली व अवैध दारूबाबत पोलीस पाटील यांचे उत्तरदायित्व नक्की करण्याची मागणी केली. त्यावर अरुण उंडे व कुणाल सोनवणे यांनी पोलीस पाटील हे गावातील कायद्याचे प्रतिनिधी असल्याने अवैध दारूबाबत त्यांनी आक्रमक भूमिका घ्यावी, सतत अवैधदारू त्या गावात सुरू राहिल्यास पोलीस पाटलांनाही त्याबाबत जबाबदार धरण्यात येईल, असा स्पष्ट इशारा दिला. पोलीस पाटील यांनी वेगवेगळ्या गावातील दारूची स्थिती मांडून रिक्त पदांची समस्या मांडली. त्यावर प्रांताधिकारी उंडे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. मच्छिंद्र देशमुख यांनी दारूबंदीच्या अवैध दारूच्या कायद्याबाबत सविस्तर भूमिका मांडून त्याबाबत राज्यस्तरावर प्रयत्न होण्याची गरज प्रतिपादन केली. तहसीलदार सिद्धार्थ मोरे यांनी पुन्हा पुन्हा त्याच त्याच गावांमध्ये अवैध दारू विक्री होत असल्याने प्रशासन, पोलीस पाटील व गावकरी यांच्या प्रयत्नातून हा प्रश्न तालुक्यातून लवकरात लवकर संपवण्याचे आवाहन केले.

# त्र्यंबकेश्वर मंदिराचा कारभार धर्मदाय आयुक्तांच्या अधिपत्याखाली येणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक -शासनाच्या नवीन धोरणानुसार, त्र्यंबकेश्वर देवस्थानचा कारभार प्रथमच थेट धर्मदाय आयुक्तांच्या अधिपत्याखाली येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. यापूर्वी देवस्थानचे विश्वस्त धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडून नेमले जात असले, तरी मंदिराचे अध्यक्ष म्हणून जिल्हा न्यायाधीश, तर सचिव म्हणून नगरपालिकेचे मुख्याधिकारी कार्यभार पाहत असत. हे शासकीय अधिकारी अन्य विश्वस्तांना सोबत घेऊन देवस्थानचा कारभार चालवत होते.त्र्यंबकेश्वर देवस्थानचा कारभार सर्वप्रथम १९९४ मध्ये न्यायाधीशांकडे (र्गीवसश) सोपवण्यात आला होता. त्यानंतर २०१३ मध्ये न्यायालयाच्या सूचनेनुसार, अध्यक्ष आणि सचिवांसह एकूण नऊ व्यक्ती विश्वस्त म्हणून मंदिराचा कारभार पाहत आहेत. मात्र, न्यायाधीशांना न्यायालयाचे नियमित काम सांभाळून देवस्थानकडे लक्ष द्यावे लागत असल्याने अनेक अडचणी येत होत्या. आता मुख्य सूत्रे थेट धर्मदाय आयुक्तांकडे जाणार असल्याने, मंदिराच्या विविध प्रलंबित कामांविषयीची निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान होईल आणि पर्यायाने विकासकामांना चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, शासनाच्या या संभाव्य निर्णयावर त्र्यंबकेश्वरमधील नागरिकांमधून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. त्र्यंबकेश्वर देवस्थानसाठी पूर्णवेळ उपधर्मदाय आयुक्त (डेप्युटी चॅरिटी कमिशनर) नियुक्त केल्यास ते मंदिराच्या कारभारावर अधिक प्रभावीपणे लक्ष ठेवू शकतील, असा एक सूर आहे. तर दुसरीकडे, त्र्यंबकेश्वर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र 'मंदिर प्राधिकरण' स्थापन करण्यात यावे, अशी मागणीही यापूर्वी सातत्याने झालेली आहे.

# वडीलांनी चापट मारली, मुलाने थेट डोक्यात टिकाव मारून हत्या केली

युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर

- कुटुंबातील भावनिक दुरावा आणि किरकोळ कारणातून उद्भवलेल्या संतापाने एका सुशिक्षित तरुणाकडून स्वतःच्या वडिलांची हत्या केल्याची धक्कादायक घटना श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा येथे बुधवारी पहाटे उघडकीस आली. वडिलांनी रात्री मारलेल्या चापटीचा राग मनात धरून मुलाने झोपेत असलेल्या वडिलांच्या डोक्यात टिकाव घालून त्यांची हत्या केल्याचा आरोप पोलिसांत दाखल झालेल्या फिर्यादीत करण्यात आला आहे.

याप्रकरणी भारती सचिन ढोकचौळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचा मुलगा प्रणव सचिन ढोकचौळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रणव ढोकचौळे याने अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले असून तो गुजरातमध्ये नोकरी करत होता. काही दिवसांपूर्वी तो गावी परतला होता. बुधवारी सकाळी सहाच्या सुमारास घरातील सदस्य आपापल्या कामात असताना भारती ढोकचौळे या घराच्या मागील बाजूस गेल्या होत्या. काही मिनिटांनी परतल्यानंतर त्यांना पती सचिन ढोकचौळे हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले. त्यांच्या डोक्याजवळ टिकाव पडलेला होता. आरडाओरड ऐकून कुटुंबीय जमा झाले. त्यानंतर बाहेर उभ्या असलेल्या प्रणवला हाक मारण्यात आली. त्यावेळी त्यानेच वडिलांच्या डोक्यात टिकाव मारल्याची कबुली दिल्याचा दावा फिर्यादीत करण्यात आला आहे. लहान भावावर अधिक प्रेम केले जात असल्याची भावना आणि रात्री वडिलांनी मारलेल्या चापटीचा राग यामुळे हे कृत्य केल्याचे त्याने सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# 12 जूनला ओबीसींचे आंदोलन

मुंबई (वृत्तसंस्था)

ओबीसींच्या विविध मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत 'ओबीसी जनमोर्चा'चे अध्यक्ष आणि माजी आमदार प्रकाश शेंडगे यांनी १२ जून रोजी राज्यव्यापी आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. सरकारने ओबीसी समाजाच्या मागण्यांवर तात्काळ सकारात्मक निर्णय न घेतल्यास हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा शेंडगे यांनी दिला आहे.प्रकाश शेंडगे यांनी सांगितले की, मराठा आरक्षणाबाबत सरकार घेत असलेल्या काही निर्णयामांमुळे ओबीसींच्या हक्कांवर गदा येत असल्याची भावना समाजात निर्माण झाली आहे. सगेसोयऱ्यांच्या अध्यादेशाची अंमलबजावणी झाल्यास ओबीसींचे मोठे नुकसान होईल. केवळ राजकीय फायद्यासाठी बहुसंख्य ओबीसी समाजाला गृहीत धरले जात असून, आपल्या हक्काचे आरक्षण टिकवण्यासाठी राज्यातील सर्व ओबीसी घटकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. १२ जून रोजी होणारे हे आंदोलन राज्यातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर शांततापूर्ण पण प्रभावी मार्गाने केले जाणार असून, याद्वारे सरकारला ओबीसींची ताकद दाखवून दिली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# शिवसेनेच्या उपजिल्हाप्रमुख आशा केदारी यांचा राजीनामा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यासह उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यात शिवसेना (उबाठा) पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला असून महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख सौ. आशा संदीप केदारी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी संपर्क प्रमुख यांचे मार्फत पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे पाठविलेल्या पत्राद्वारे महिला उपजिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा सादर केला आहे. ३ जून २०२६ रोजी दिलेल्या राजीनामा पत्रात आशा केदारी यांनी वैयक्तिक कारणांमुळे पदाचा राजीनामा देत असल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे संगमनेरसह उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यात राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून आगामी स्थानिक राजकारणावर त्याचे परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महिला आघाडीच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांत त्यांनी विविध सामाजिक व संघटनात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला होता. त्यामुळे त्यांच्या अचानक झालेल्या राजीनाम्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे. राजीनाम्यामागे नेमकी कोणती कारणे आहेत, याबाबत मात्र अधिकृत माहिती समोर आलेली नाही. दरम्यान, केदारी यांच्या राजीनाम्यामुळे शिवसेना (उबाठा) पक्षाच्या संगमनेर तालुक्यातील महिला संघटनात्मक बांधणीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. राजकीय जाणकारांच्या मते, आगामी काळात आशा केदारी कोणत्या पक्षात प्रवेश करतात किंवा सक्रिय राजकारणात कोणती भूमिका घेतात, यावर तालुक्यातील महिला राजकारणाची समीकरणे अवलंबून राहू शकतात.

# संशोधनातून नवकल्पना, शिक्षणातून यश

## एसएमबीटी कॉलेज ऑफ फार्मसीचा गौरवशाली प्रवास

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक- संशोधन क्षेत्रातील नावीन्यपूर्ण कामगिरी, जागतिक दर्जाचे शैक्षणिक कोलॅबोरेशन आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या त्रिसूत्रीच्या जोरावर एसएमबीटी 'कॉलेज ऑफ फार्मसी'ने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांच्या संशोधनासाठी वाव देत जागतिक पातळीवर एक्स्पोजर मिळवून देण्यासाठी हे महाविद्यालय एक प्रगत व्यासपीठ ठरले आहे.

या महाविद्यालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कॅम्पसमध्येच उपलब्ध असलेले तब्बल १२०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय! यामुळे येथील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष रुग्ण सेवा आणि क्लिनिकल फार्मसीचा व्यावहारिक अनुभव मिळत आहे. उत्तम दर्जाच्या संशोधनासाठी महाविद्यालयात 'स्टेट ऑफ द आर्ट' रिसर्च लॅबोरेटरी आणि सोफिस्टिकेटेड नालिटिकल इन्स्ट्रुमेंट्सची सुविधा आहे. या समृद्ध शैक्षणिक वातावरणामुळेच प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी ५०० पेक्षा अधिक रिसर्च पेपर्स प्रसिद्ध केले आहेत. यामध्ये फार्मसी



विभागाच्या वतीने दरवर्षी तब्बल १०० ते १५० शोधनिबंध आंतरराष्ट्रीय स्तरावर नामांकित जर्नल्समध्ये प्रकाशित केले जातात. महाविद्यालयाच्या नावावर ५०० हून अधिक पब्लिकेशन्स, ७० पेक्षा अधिक स्कोपस आर्टिकल्स प्रसिद्ध झाले आहेत. विशेष म्हणजे चालू वर्षी २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी संशोधन कार्य पूर्ण केले आहे. संशोधन कार्यास वाव मिळावा म्हणून यावर्षी २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध शोधनिबंध प्रसिद्ध करून पारितोषिके पटकावली आहेत.

विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी गेल्या २० वर्षांपेक्षा अधिक काळ या महाविद्यालयाने हजारो विद्यार्थी घडवले आहेत. आज जगाच्या कानाकोपऱ्यात हे विद्यार्थी उल्लेखनीय कामगिरी करत असल्याचे विभागप्रमुख कुंदन तिवारी यांनी सांगितले. ते म्हणाले, जगभरातील १० पेक्षा अधिक परदेशी संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यात प्रामुख्याने थायलंड, युएई, मलेशिया, इंडोनेशिया, नेपाळ, श्रीलंका, फिलीपिन्स आणि व्हिएतनाम या देशांमधील ९ नामांकित आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचा समावेश आहे. या करारांतर्गत विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय स्टडी टूरचे आयोजन केले जाते. विशेष म्हणजे, या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना आर्थिक हातभार आणि विशेष स्कॉलरशिप देखील दिली जाते.

हे महाविद्यालय उच्च शिक्षणाचे एक अग्रगण्य केंद्र बनले असून येथे मान्यताप्राप्त पीएचडी सेंटर आहे. महाविद्यालयातील १३ पेक्षा अधिक अनुभवी प्राध्यापक स्वतः पीएचडी धारक असून ते मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय, विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'जीपॅट' आणि 'नायपर' या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षांची संपूर्ण तयारी महाविद्यालयातच करून घेतली जाते. विद्यार्थी केंद्रित शिक्षण देत असतानाच त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी सायको-सोशल सपोर्ट आणि शारीरिक स्वास्थ्यासाठी ट्रेनरसह हाय-क्वालिटी जिम, झुंबा, योगा आणि २४ तास स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची सुविधा उपलब्ध आहे. कॅम्पसमध्ये भव्य क्रिकेट ग्राउंड देखील आहे. महाविद्यालयाचे हॉस्टेल सर्व सोयींनी युक्त असून, रात्रीच्या अभ्यासासाठी 'नाईट लायब्ररी'ची विशेष सुविधा आहे. ग्रंथालयात १० हजारांहून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. संपूर्ण कॅम्पस पर्यावरणपूरक, 'प्लास्टिक आणि व्हेईकल फ्री' असून अंतर्गत दळणवळणासाठी बॅटरी ऑपरेटेड बग्गी आणि सायकल फॅसिलिटी दिली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सामाजिक जाणीव देखील रुजवली जात असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो.

**सक्षम संशोधक घडविण्यासाठी प्रयत्न- परदेशी विद्यापीठांसोबतच्या करारांमुळे आमच्या विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण पद्धती प्रत्यक्ष अनुभवता आली. हा अनुभव त्यांच्या करिअरला एक नवी आणि सक्षम दिशा देणारा ठरत आहे. आम्ही केवळ संशोधन करत नसून, जागतिक आव्हानांना तोंड देऊ शकतील असे सक्षम संशोधक घडवत आहोत.**

**डॉ. योगेश उशीर,**
**प्राचार्य, कॉलेज ऑफ फार्मसी**



## नॉर्वे चेसमध्ये ऐतिहासिक कामगिरी

# प्रज्ञानानंदाने रचला नवा इतिहास

भारताचा २० वर्षीय ग्रँडमास्टर प्रज्ञानानंदा रमेशबाबूने नॉर्वे चेस २०२६ च्या आठव्या फेरीत जगातील नंबर-१ खेळाडू आणि पाच वेळा वर्ल्ड चॅम्पियन मॅग्नस कार्लसनला हरवले. प्रज्ञानानंदाचा कार्लसनविरुद्ध या स्पर्धेतील हा दुसरा विजय आहे.

यापूर्वी २८ मे रोजी त्याने पांढऱ्या मोहऱ्यांनी हरवले होते. मंगळवारी त्याने काळ्या माहऱ्यांनी विजय मिळवला. या विजयासह आर. प्रज्ञानानंदा भारताचा दुसरा असा खेळाडू बनला आहे, ज्याने एकाच स्पर्धेत मॅग्नस कार्लसनला दोनदा हरवले आहे.

क्लासिकल बुद्धिबळाच्या गेल्या १९ वर्षांत ही पहिलीच वेळ आहे, जेव्हा एखाद्या खेळाडूने एकाच स्पर्धेत कार्लसनला दोनदा हरवले आहे. यापूर्वी २००७ मध्ये विश्वनाथन आनंदने लिनारेस आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कार्लसनला सलग दोन सामन्यांत पराभूत केले होते. आठव्या फेरीतील आणखी एका क्लासिकल सामन्यात फ्रान्सच्या अलीरेझा फिरोजाने सध्याचा वर्ल्ड चॅम्पियन भारताच्या गुकेश डोमराजु (डी गुकेश) ला हरवले. पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या फिरोजाने वेळेच्या दबावाखाली अंतिम टप्प्यात (एंडगेममध्ये) उत्कृष्ट खेळ दाखवला आणि गुकेशच्या चुकांचा फायदा घेतला. या विजयामुळे फिरोजाचे १३ गुण झाले आहेत. स्पर्धेतील आघाडीवर असलेले वेस्ली सो आणि विन्सेंट केमर यांच्यातील क्लासिकल सामना बरोबरीत सुटला. त्यानंतर झालेल्या 'आर्मागेडन' सामन्यात वेस्ली सोने विजय मिळवून अतिरिक्त गुण मिळवले आणि १४ गुणांसह आघाडी कायम राखली. प्रज्ञानानंदा १२ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

नॉर्वे चेस महिला स्पर्धेच्या आठव्या फेरीत भारतासाठी संमिश्र दिवस राहिला. स्पर्धेची आघाडीची खेळाडू बीबीसारा असाउबायेवा यांनी भारताच्या दिव्या देशमुखला क्लासिकल सामन्यात हरवले. काळ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या बीबीसाराने सतत दबाव कायम ठेवला. शेवटच्या क्षणी दिव्याजवळ वेळ कमी उरला आणि ती सामना हरली. झू जिनरने सध्याच्या महिला विश्वविजेत्या जू वेनजुनला हरवून मोठा उलटफेर केला.

भारताची दिग्गज खेळाडू कोनेरू हम्पी आणि अन्ना मुजीचुक यांच्यातील क्लासिकल सामना ड्रॉ राहिला. त्यानंतर अतिरिक्त गुणांसाठी झालेल्या अर्मागेडन सामन्यात कोनेरू हम्पीने काळ्या मोहऱ्यांनी विजय मिळवला. महिलांच्या गुणतालिकेत बीबीसारा १५.५ गुणांसह आघाडीवर आहे. अन्ना मुजीचुक १०.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आणि दिव्या देशमुख १० गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

# विश्वचषकाआधी फुटबॉलमध्ये मोठे बदल

२०२२ मध्ये कतारमध्ये लिओनेल मेस्सीने विश्वचषक ट्रॉफी उंचावत इतिहास रचला. त्या अविस्मरणीय क्षणानंतर फुटबॉलच्या विश्वात अनेक मोठे बदल झाले आहेत. अनेक स्टार खेळाडूंनी क्लब बदलले, नव्या प्रतिभांचा उदय झाला आणि दिग्गजांनी नवे विक्रम आपल्या नावावर केले.

विश्वचषकानंतर मेस्सीने युरोपियन फुटबॉलला अलविदा करत अमेरिकेतील इंटर मियामी क्लबमध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी १०४ सामन्यांत ९० गोल करत संघाला लीग कप (२०२३), सपोर्टर्स शिल्ड (२०२४) आणि एमएलएस कप (२०२५) अशी तीन मोठी विजेतेपदे मिळवून दिली. आता ते पुन्हा अर्जेंटिनाच्या नेतृत्वाची धुरा सांभाळताना दिसणार आहेत. मेस्सीच्या युरोपमधून निर्गमनानंतर बार्सिलोनामध्ये लामिने यमाल या नव्या सुपरस्टारचा उदय झाला. १५ व्या वर्षी पदार्पण करणाऱ्या यमालने अवघ्या १८ व्या वर्षी तीन ला लीगा आणि युरो कप जिंकत जागतिक फुटबॉलचे लक्ष वेधून घेतले आहे. अनेकजण त्याला मेस्सीचा खरा वारसदार मानत आहेत.



दुसरीकडे, क्रिस्टियानो रोनाल्डोही चर्चेत कायम आहे. २०२२ विश्वचषकानंतर अल-नासर क्लबमध्ये दाखल झालेला रोनाल्डो आता ४१ व्या वर्षी पोर्तुगालसाठी सहावा विश्वचषक खेळण्यास सज्ज आहे. कारकिर्दीतील ९७३ गोलांसह तो १००० गोलांच्या ऐतिहासिक टप्प्याच्या अगदी जवळ पोहोचला आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



# कर्जमाफी शासन आदेशाची अकोलेत होळी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले -कर्जमाफीसाठी सरकारने काढलेल्या शासन आदेशामध्ये अत्यंत जाचक अटी शर्ती लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या वेळची कर्जमाफी आज पर्यंतच्या सर्व कर्जमाफ्यांमध्ये सर्वात कडक अटी शर्ती असलेली व खूप कमी शेतकऱ्यांना लाभ देणारी ठरणार आहे. सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात संताप व्यक्त करण्यासाठी किसान सभेने या आदेशाची राज्यभर होळी करण्याची हाक दिली होती.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे यानुसार अध्यादेशाची होळी करण्यात आली. उद्या व परवा सलग दोन दिवस राज्यभर हे होळी आंदोलन सुरू राहणार आहे. सरकारने कर्जमाफी करताना, २०१९ मध्ये कर्जमाफी घेतलेले शेतकरी, जरी ते यावेळी थकित असले तरी त्यांना केवळ ५० हजार रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी देण्यात येणार आहे. नियमित कर्जदारांना सुद्धा केवळ ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. त्यांनाही किमान दोन वर्ष नियमित कर्जदार असणे ही अट टाकण्यात आली आहे. अत्यल्प पगारावर राबणाऱ्या सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीतून वगळण्यात आले आहे. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन द्यायचे आणि आता २ लाख कर्ज माफ करणार सांगून बहुसंख्य शेतकऱ्यांची केवळ ५० हजारावर बोळवणूक करायची ही अत्यंत संतापजनक गोष्ट आहे. शेतकऱ्यांची घोर फसवणूक आहे.

शेतकऱ्यांच्या या फसवणुकी विरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून तो राज्यभर आंदोलनाच्या माध्यमातून व्यक्त होत आहे. अकोले येथे झालेल्या आंदोलनात शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. अकोले शहरातील महत्मा फुले चौकात फसव्या कर्जमाफी अध्यादेशाचे दहन करून आंदोलन करण्यात आले. कर्जमाफीसाठी लावण्यात आलेल्या अटी रद्द करा. सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या. नियमित कर्जदार शेतकरी, शेड नेट, पॉली हाऊस शेतकरी, कुक्कुट पालन शेतकरी यांच्यासह सर्व पीक व शेती सुधारणा कर्ज माफ करा या मागण्या यावेळी करण्यात आल्या.

आंदोलनाचे नेतृत्व कॉम्रेड सदशिव साबळे, गणेश ताजणे, लक्ष्मण घोडे, बाळासाहेब मधे, संगिता साळवे, हेमलता शेळके, दत्ता कोंडार, दिलिप हिंदोळे, आप्पा घोडे, वामन मधे यांनी केले.

# अकोलेत कै. मधुकरराव पिचड जयंती व्याख्यान

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - सत्तेत आणि सत्तेबाहेर असतानाही कै. मधुकरराव पिचड यांचा लढाऊ बाणा कायम राहिला. भंडारदरा धरणावरील पाण्याचा हक्क, निळवंडे धरण निर्मितीतील योगदान आणि दूध उत्पादन क्षेत्रातील क्रांतीत त्यांचे कार्य लक्षणीय ठरले, असे प्रतिपादन डॉ. सुनील शिंदे यांनी केले. अगस्ती महाविद्यालय आणि अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीने आयोजित केलेल्या कै. मधुकरराव पिचड जयंती व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजवादी व शेतकरी नेते दशरथ सावंत होते.

डॉ. शिंदे यांनी पिचड यांच्या कार्याचा मागोवा घेताना सांगितले की, प्रा. ग. प्र. प्रधान, मोहन धारिया आणि प्रकाश आंबेडकर यांसारख्या धुरंधर नेत्यांनीही त्यांच्या आदिवासी विकासाच्या कार्याची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अचूक पारख करून त्यांना पहिली उमेदवारी दिली आणि खऱ्या अर्थाने अकोले तालुक्याच्या विकासाचा शुभारंभझाला. समयसूचकता आणि धाडस हे त्यांच्या कार्याचे बलस्थान होते. लिफ्ट इरिगेशन, बंधारे, पुलांची निर्मिती आणि दुग्ध व्यवसायातील

क्रांतीतून त्यांनी आपला ठसा उमटवला. दशरथ सावंत यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, प्रशासनावर पिचड यांचे विलक्षण नियंत्रण होते. प्रसंगी कायद्याची चौकट सैल ठेवून धरणग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले पुनर्वसनाचे कार्य हा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग ठरला. उपेक्षित व वंचित घटकांसाठी त्यांनी



सातत्याने

पाठपुरावा केला. राजूरच्या माजी सरपंच हेमलताताई पिचड यांनीही त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची माहिती देत मनोगत व्यक्त केले. एआयसीटीईच्या मंजुरीनुसार अकोले येथील पॉलिटेक्निक कॉलेजचे 'लोकनेते मधुकरराव पिचड पॉलिटेक्निक कॉलेज, अकोले' असे नामकरण करण्यात आले. या नामफलकाचे अनावरण हेमलताताई पिचड, दशरथ सावंत, कायम विश्वस्त गिरजाजी जाधव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य आणि साहित्यिक डॉ. भास्कर शेळके यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला, तसेच 'अगस्त्य' वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कायम विश्वस्त गिरजाजी जाधव यांनी केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, अॅड. आनंदराव नवले, यशवंत आभाळे, सुधाकर आरोटे, कल्पना सुरपुरिया, शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर, डॉ. आर. डी. पल्हाडे, डॉ. प्रशांत तांबे आणि प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजी खेमनर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. आभार सुधाकर देशमुख यांनी मानले.

# साने गुरुजींच्या विचारांचा वारसा जपणारे डॉ. सुधीर तांबे

समाजसेवा ही केवळ कार्यपद्धती नसून ती एक जीवननिष्ठा असते. समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांच्या उन्नतीसाठी स्वतःचे आयुष्य समर्पित करणारी व्यक्तिमत्त्वे समाजाच्या इतिहासात आदराचे स्थान मिळवतात. शिक्षण, आरोग्य, सहकार, सामाजिक बांधिलकी आणि लोकप्रतिनिधित्व या क्षेत्रांत चार दशकांहून अधिक काळ अविरत कार्य करणारे ज्येष्ठ समाजकारणी, शिक्षणप्रेमी आणि माजी आमदार डॉ. सुधीर भास्करराव तांबे यांना राष्ट्र सेवा दलाच्या वतीने जाहीर झालेला साने गुरुजी जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या समाजाभिमुख कार्याचा योग्य सन्मान मानला जात आहे.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात डॉ. सुधीर तांबे हे नाव विकासाभिमुख राजकारण, मूल्यनिष्ठ नेतृत्व आणि जनसामान्यांप्रती असलेल्या संवेदनशीलतेसाठी ओळखले जाते. वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी केवळ डॉक्टर म्हणून कारकीर्द न घडवता समाजपरिवर्तनाचे व्यापक ध्येय स्वीकारले. पुणे येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. पदवी आणि पुढे उच्च शिक्षण पूर्ण करून त्यांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाला स्वतःला वाहून घेतले.

नाशिक पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी महाराष्ट्र विधान परिषदेवर सलग तीन वेळा निवडून येण्याचा मान मिळवला. विधान परिषदेत त्यांनी शिक्षण, रोजगार, ग्रामीण विकास, शेतकरी प्रश्न, सहकार आणि आरोग्य यांसारख्या विषयांवर सखोल अभ्यासपूर्ण मांडणी केली. पदवीधर मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांचे प्रश्न सातत्याने मांडले. राजकारणाला सत्तेचे साधन न मानता लोकसेवेचे माध्यम म्हणून पाहण्याची त्यांची भूमिका विशेष उल्लेखनीय ठरते.

संगमनेर येथील अमृतवाहिनी ग्रामीण धर्मादाय रुग्णालय आणि विविध शैक्षणिक संस्थांच्या उभारणीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण भागातील



सर्वसामान्य नागरिकांना शहरांप्रमाणे दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने त्यांनी अनेक उपक्रम राबवले. मोफत १०८ रुग्णवाहिका सेवा, ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा आणि एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार हे त्यांच्या दूरदृष्टीचे उदाहरण आहे. आज हजारो रुग्ण आणि विद्यार्थी या संस्थांच्या माध्यमातून लाभ घेत आहेत.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचा त्यांचा दृढ विश्वास आहे. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. अनेक शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण युवकांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात त्यांचे मोठे योगदान आहे.

सहकार क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. १९९८ मध्ये स्थापन झालेल्या डक-चझठज या संस्थेच्या माध्यमातून शेतमाल प्रक्रिया, विपणन आणि मूल्यवर्धनाला चालना मिळाली. शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडून त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरले.

साहित्य, संस्कृती आणि सामाजिक प्रबोधन यांबाबतही त्यांची तितकीच आस्था राहिली आहे. अखिल भारतीय बाल महोत्सव, बंधुता साहित्य संमेलन, मराठी नवोदित साहित्य संमेलन यांसारख्या अनेक वैचारिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सामाजिक सलोखा, बंधुता आणि लोकशिक्षणाची परंपरा जोपासण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले.

ज्या साने गुरुजींच्या नावाने हा पुरस्कार दिला जातो, त्या साने गुरुजींनी प्रेम, समता, करुणा, बंधुता आणि मानवतेची मूल्ये आपल्या साहित्य आणि कृतीतून समाजासमोर ठेवली. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान, अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेला संघर्ष, आंतरभारतीची संकल्पना आणि खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे हा संदेश आजही समाजाला प्रेरणा देत आहे. साने गुरुजींच्या या मूल्यपरंपरेशी सुसंगत असे कार्य डॉ. सुधीर तांबे यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात जपले आहे. राष्ट्र सेवा दलाकडून प्रदान करण्यात आलेला साने गुरुजी जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या कार्याचा केवळ गौरव नसून मूल्याधिष्ठित समाजकारणाचा सन्मान आहे. शिक्षण, आरोग्य, सहकार आणि सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात त्यांनी उभा केलेला आदर्श पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. समाजहितासाठी समर्पित असलेल्या त्यांच्या जीवनप्रवासाला हा पुरस्कार एक मानाचा मुकुट ठरला आहे. डॉ. सुधीर तांबे यांचे कार्य समाजासाठी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक राहिले आहे आणि पुढील काळातही त्यांची प्रेरणा अनेक सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी आणि तरुणांना नवी दिशा देत राहील, यात शंका नाही.

**–प्रा. नितिन नवले, संगमनेर**

# नीट परीक्षा सुरक्षिततेबाबत छात्र भारतीचे राष्ट्रीय संस्थेला पत्र

युवावार्ता (प्रतिनिधी)

नीट परीक्षेतील पेपर फुटीचा विषय केवळ काही उमेदवारांनी परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका मिळवून, गुणवत्ता यादीत स्थान मिळवण्यापुरता मर्यादित नाही. परीक्षा केंद्रांवर होणाऱ्या संभाव्य गैरप्रकारांबाबत देखील गंभीर शंका निर्माण होत असल्याचे सांगत छात्र भारती विद्यार्थी संघटनेने राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या महासंचालकांना पत्र पाठवून नीट परीक्षेतील सुरक्षा, देखरेख व उत्तरपत्रिकेच्या सुरक्षिततेबाबत काही सूचना केल्याची माहिती छात्र भारतीचे राज्य अध्यक्ष अनिकेत घुले यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

प्रसिध्दी पत्रात म्हटले आहे की, जिल्हास्तरावर परीक्षा घेण्याची जबाबदारी साधारणपणे प्राचार्यांकडे सोपवली जाते. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचा समावेश असलेली समन्वय समिती परीक्षा प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी असते. मात्र काही जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेनुसार अनेक वेळा या समितीच्या बैठका घेतल्या जात नाहीत, तसेच अनेक सदस्यांना परीक्षा व्यवस्थेबाबत योग्य माहिती नसते. परीक्षेची केंद्रे अनेकदा विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यात असतात. काही वेळा विद्यार्थी ज्या



संस्थेत शिकले आहेत त्याच संस्थेत परीक्षा देण्याची शक्यता असते. प्राचार्य हे केंद्रप्रमुख असतात, तर विज्ञान विषयाच्या शिक्षकांसह इतर शिक्षकांची नियुक्ती पर्यवेक्षक म्हणून केली जाते. यामुळे गैरप्रकाराची शक्यता निर्माण होऊ शकते. परीक्षा केंद्राचे संपूर्ण नियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली असावे तसेच प्राचार्यांसोबत अतिरिक्त शासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करून केंद्राची देखरेख करण्यात यावी. विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची कार्बन कॉपी किंवा दुसरी प्रत दिली जात नाही. त्यामुळे परीक्षा झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात रिकामी असलेली उत्तरपत्रिका भरली जाण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. तसेच विद्यार्थ्याने योग्य प्रकारे सोडवलेल्या उत्तरपत्रिकेत नंतर फेरफार करून विद्यार्थ्याच्या निकालावर परिणाम करण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. त्यामुळे सध्याच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. या समस्या सोडवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला उत्तरपत्रिकेची दुय्यम प्रत देण्यात यावी. प्रत्येक विद्यार्थ्याने किती प्रश्न सोडवले आहेत याचा अहवाल परीक्षा कक्षातच तयार करून

विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी. उत्तरपत्रिकेच्या दोन्ही प्रती फक्त राष्ट्रीय परीक्षा संस्थेकडे न ठेवता, एक सीलबंद प्रत जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात सुरक्षित ठेवण्यात यावी. राष्ट्रीय परीक्षा संस्थेकडून मूळ उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करून नीटचा निकाल जाहीर केल्यानंतर तज्ञ समितीमार्फत मूळ उत्तरपत्रिका आणि जिल्हास्तरावर सुरक्षित ठेवलेली सीलबंद प्रत यांची तुलना करून पडताळणी करण्यात यावी. केंद्र सरकारने २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या नीट परीक्षेपूर्वी या सुधारणा लागू करण्याचा विचार करावा, अन्यथा परीक्षा केंद्रांवर किंवा परीक्षा झाल्यानंतरच्या मूल्यांकन प्रक्रियेत गैरप्रकार होण्याची शक्यता कायम राहील आणि संपूर्ण परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता व निष्पक्षता धोक्यात येईल. अशा सूचना छात्र भारती विद्यार्थी संघटनेने केल्या आहेत.

# अमृतवाहिनी इंजिनिअरिंग एमबीए विभागांमध्ये ८५ टक्के प्लेसमेंट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमधील एमबीए विभागातून मागील सत्रातील ६० पैकी ५१ विद्यार्थ्यांना थेट नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या असून एमबीए अभ्यासक्रमातून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांनी स्वतःचा स्टार्टअप व्यवसाय सुरू केला आहे. याचबरोबर एनआयएसएम प्रमाणपत्र अभ्यासक्रम देखील सुरू झाले असल्याची माहिती प्राचार्य डॉ.एम. ए. वेंकटेश यांनी दिली.

अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेज मधील एमबीए विभागातून मागील दोन वर्ष १००% प्लेसमेंट पूर्ण झाले तर यावर्षी ८५ टक्के विद्यार्थ्यांना थेट नोकरीच्या संधी मिळाली आहे.८.५ लाख वार्षिक पॅकेज पासून अनेक विद्यार्थ्यांना मार्केटिंग, आर्थिक, एच. आर, माहिती तंत्रज्ञान, व्यवसाय वाढ या विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या पदावर काम करण्याची संधी मिळणार आहे. टीसीएस, मेझॉन, एसबीआय कार्ड्स, इंडिया मार्ट, होम स्मार्ट फायनान्स, डेटामॅटिक्स, एचडीएफसी लाइफ, बर्जर पेंट्स, बजाज फायनान्स, शिपला, सेंट गोबेन, सुला वाइन, झेब्रामिक्स इंडिया,नोलेकसा, हिंदुस्तान फुड्स, टीडीएस कॅपिटल या विविध कंपन्यांमध्ये या विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली आहे. या विद्यार्थ्यांच्या नोकरीसाठी प्लेसमेंट ऑफिसर डॉक्टर सचिन खर्डे यांनी विशेष प्रयत्न केले आहे.

एमबीए महाविद्यालयात स्टार्टअप आणि उबवणी केंद्राच्या माध्यमातून पाच विद्यार्थ्यांनी स्वतःचे व्यवसाय यशस्वीरित्या सुरू केले असून विद्यार्थ्यांना वित्तीय विकास महामंडळाच्या माध्यमातून शेअर बाजार सराव प्रसंग अभ्यास व्यवसाय आराखडा स्पर्धा याबाबतचे मार्गदर्शन दिले जाते. याचबरोबर उद्योजक व स्पर्धात्मक बनवण्यासाठी एनआयएसएम हा नवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आले असल्याची माहिती विभाग प्रमुख डॉ वृषाली साबळे यांनी दिली आहे. स्वायत्त अभ्यासक्रम अंतर्गत या वर्षापासून व्यवस्थापनामध्ये गुरु छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवन वारसा रणनीती आणि गनिमी कावा या आधारित नवीन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आले असल्याची माहिती डॉ. साबळे यांनी दिली आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, अकॅडमिक डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ.एम. ए. व्यंकटेश, विभाग प्रमुख डॉ. वृषाली साबळे यांच्या सह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

**आंतरराष्ट्रीय संधीसाठी जपानी भाषेचे प्रशिक्षण - अमृतवाहिनीच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर संधी उपलब्ध व्हाव्या याकरता महाविद्यालयात साकुरा जपानी लर्निंग सेंटर सुरू करण्यात आले आहे. यामधून विविध परदेशी भाषांचे प्रशिक्षण दिले जात आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर करिअरच्या नव्या संधी उपलब्ध झाले असल्याची माहिती डॉ.वृषाली साबळे यांनी दिली आहे.**

# अखेर मॉन्सून केरळमध्ये दाखल

मुंबई (वृत्तसंस्था)

सर्वांकरिता आनंदाची बातमी आहे. अखेर मोठ्या प्रतिक्षेनंतर केरळमध्ये मॉन्सून दाखल झाला. केरळमध्ये मॉन्सून ३ दिवस उशिराने दाखल झाला. याबाबत बोलताना प्रवीण कुमार वैज्ञानिक हवामान विभाग यांनी म्हटले की, मॉन्सून केरळमध्ये आलाय. दक्षिण महाराष्ट्रात पुढच्या काही दिवसात मान्सून दाखल होईल. विदर्भात १५ जून नंतरच मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. पुढचे २ ते ३ दिवस विदर्भातील काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट असून जोरदार वाऱ्यासह हलक्या पावसाचा अंदाज आहे. विदर्भातील जिल्ह्यात ढगाळ वातावरण असलं तरी सध्या असच तापमान कायम असेल, ४० ते ४२ डिग्री पर्यंत उन्हाचा पारा असेल. विदर्भात पुढील काही दिवस वादळीवाऱ्याचा मध्यमस्वरूपाचा पाऊस होईल. मात्र, आता येणारा पाऊस हा अवकाळीच असेल कारण मान्सूनच्या अनुषंगाने अजून विदर्भात अनुकुल वातावरण निर्माण व्हायचे आहे.विदर्भासह राज्यात १५ जूनच्या आसपास मॉन्सून दाखल होईल.

वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मध्यम स्वरूपाच पाऊस आणि वादळी वारा असणार आहे. पण अवकाळी पाऊस असेल, हा मान्सून पूर्व पाऊस नसेल. विदर्भाला मान्सूनसाठी अजून प्रतिक्षा कायम असणार आहे मात्र १० जून नंतर परिस्थितीच्या अनुषंगाने याचा अंदाज घेता येईल.विदर्भातील काही जिल्ह्यांत येत्या २४ तासात काही ठिकाणी वादळासह तुरळक पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे. उत्तर प्रदेशपासून विदर्भ होत रायलसीमापर्यंत उंचावर सायक्लोनिक सर्क्युलेशन आणि झंजावत तयार झाला आहे. याच्या प्रभावाने येत्या २४ तासात विदर्भातील काही जिल्ह्यात विजा आणि वादळासह तुरळक स्वरूपात पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.या काळात तापमानात चढ-उतार होणार असून उकाड्याचा त्रास कायम राहण्याचा अंदाज आहे.

# संपादकीय...

## सरकारी नोकरी, गडगंज पगार तरी भ्रष्टाचाराची हाव...

देशातील लाखो तरुणांचे स्वप्न असते की त्यांना सरकारी नोकरी मिळावी. कारण सरकारी नोकरी म्हणजे नोकरीची सुरक्षितता, चांगला पगार, विविध भत्ते, निवृत्तीनंतर पेन्शन किंवा आर्थिक सुरक्षा, सामाजिक प्रतिष्ठा आणि अनेक सुविधा. एकदा सरकारी सेवेत प्रवेश मिळाला की आर्थिक स्थैर्याची चिंता मोठ्या प्रमाणात कमी होते. तरीही अनेकदा असे दिसून येते की काही सरकारी अधिकारी आणि कर्मचारी भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकतात. प्रश्न असा निर्माण होतो की, सर्व प्रकारच्या सुविधा आणि भरघोस वेतन मिळत असताना भ्रष्टाचार करण्याची गरज का भासते? भ्रष्टाचाराचे मूळ कारण केवळ आर्थिक गरज नसते. अनेक वेळा त्यामागे अमर्याद लोभ आणि अधिकाधिक संपत्ती मिळवण्याची मानसिकता असते. गरजा आणि इच्छा यांमध्ये मोठा फरक असतो. गरजा मर्यादित असतात, परंतु इच्छा अमर्याद असतात. काही लोकांना मिळणारे वेतन आणि सुविधा पुरेशा वाटत नाहीत. त्यांना अधिक पैसा, अधिक मालमत्ता, अधिक ऐश्वर्य आणि इतरांपेक्षा वरचढ जीवनशैली हवी असते. हीच मानसिकता भ्रष्टाचाराला खतपाणी घालते. समाजातील वाढती स्पर्धा हेही एक महत्त्वाचे कारण आहे. आज अनेकजण आपल्या यशाचे मोजमाप संपत्ती, बंगले, महागड्या गाड्या आणि बाह्य दिखाव्यावरून करतात. त्यामुळे काही सरकारी कर्मचारी आपल्या अधिकृत उत्पन्नापेक्षा जास्त वैभव मिळवण्यासाठी गैरमार्गाचा अवलंब करतात. सगळेच घेतात, मग आपण का नाही? अशी मानसिकता निर्माण झाल्यावर भ्रष्टाचाराला एक प्रकारची सामाजिक मान्यता मिळते, जी अत्यंत धोकादायक आहे.

प्रशासकीय यंत्रणेतील काही त्रुटी देखील भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरतात. ज्या ठिकाणी अधिकार जास्त आणि उत्तरदायित्व कमी असते, तेथे गैरव्यवहाराची शक्यता वाढते. एखाद्या कामासाठी नागरिकाला अनेक कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असतील, प्रक्रिया गुंतागुंतीची असेल किंवा निर्णय घेण्याचा अधिकार काही मोजक्या व्यक्तींकडे केंद्रीत असेल, तर भ्रष्टाचाराला संधी निर्माण होते. दंडात्मक कारवाईचा अभाव हे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. अनेक वेळा भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये चौकशी वर्षानुवर्षे चालते. दोषी व्यक्तींवर तातडीने आणि कठोर कारवाई होत नाही. त्यामुळे काही लोकांमध्ये कायद्याची भीती कमी होते. पकडले जाण्याची शक्यता कमी आणि बेकायदेशीर कमाईची संधी जास्त असेल, तर काही व्यक्ती भ्रष्टाचाराचा मार्ग स्वीकारतात. भ्रष्टाचाराच्या मागे मानसिक आणि नैतिक अध:पतनही कारणीभूत असते. सरकारी सेवा ही लोकसेवा मानली जाते. नागरिकांच्या हितासाठी काम करणे ही सरकारी कर्मचाऱ्यांची जबाबदारी असते. परंतु जेव्हा सेवाभावाऐवजी स्वार्थ, पदाचा गैरवापर आणि वैयक्तिक लाभ यांना महत्त्व दिले जाते, तेव्हा भ्रष्टाचार वाढतो. मूल्याधिष्ठित शिक्षणाचा अभाव आणि नैतिकतेकडे दुर्लक्ष यामुळे ही समस्या अधिक गंभीर बनते.

याचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसतो. एखाद्या प्रमाणपत्रासाठी, परवान्यासाठी किंवा शासकीय योजनेचा लाभ मिळवण्यासाठी लाच द्यावी लागल्यास नागरिकांचा शासनव्यवस्थेवरील विश्वास कमी होतो. विकासकामांचा दर्जा खालावतो, सार्वजनिक निधीचा अपव्यय होतो आणि समाजात अन्यायाची भावना वाढीस लागते. परिणामी, देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीवरही विपरीत परिणाम होतो. भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत. प्रशासनात पारदर्शकता, डिजिटल प्रक्रिया, नियमित लेखापरीक्षण आणि प्रभावी देखरेख आवश्यक आहे. तितकेच महत्त्वाचे म्हणजे नैतिक मूल्यांचे संवर्धन. सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये लोकसेवेची भावना, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी यांचा विकास होणे गरजेचे आहे. तसेच नागरिकांनीही भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देणाऱ्या कृती टाळल्या पाहिजेत. सरकारी नोकरीतील चांगला पगार, भत्ते आणि सुविधा असूनही काही लोक भ्रष्टाचाराच्या मार्गावर जातात, याचे कारण गरिबीपेक्षा लोभ, मानसिकता, सामाजिक दबाव आणि व्यवस्थेतील त्रुटी हे अधिक आहे. प्रामाणिकपणा ही केवळ वैयक्तिक बाब नसून राष्ट्रनिर्मितीची मूलभूत अट आहे. जेव्हा सरकारी कर्मचारी आपली जबाबदारी लोकसेवेच्या भावनेने पार पाडतील आणि समाजही भ्रष्टाचाराविरोधात ठाम भूमिका घेईल, तेव्हाच स्वच्छ, पारदर्शक आणि विश्वासार्ह प्रशासनाची निर्मिती होऊ शकेल.

# अन्न भेसळविरोधी मोहिमेत राहुरी व नेवासात कारवाई

## आईस्क्रीम व खाद्यतेलाचा २ लाख ८४ हजार किंमतीचा साठा जप्त



जिल्हा माहिती कार्यालय -

अहिल्यानगर- जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या अन्न भेसळविरोधी विशेष मोहिमेत राहुरी व नेवासा तालुक्यात कारवाई करून २ लाख ८४ हजार १८० रुपये किमतीचे संशयित आईस्क्रीम व खाद्यतेल जप्त करण्यात आले असून नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी केले आहे.

राहुरी येथील शिवशक्ती आईस्क्रीम या आस्थापनाची तपासणी करून शिवशक्ती ब्रँडच्या आईस्क्रीम गुलकंद व अमेरिकन नट्स या उत्पादनांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. दर्जाहीन असल्याच्या संशयावरून या ठिकाणी ४१ हजार ४४० रुपये किमतीचे एकूण १४८ पॅकेट्स आईस्क्रीम जप्त करण्यात आले. तसेच नेवासा तालुक्यातील कडू गल्ली येथील संतोष किराणा स्टोअर्सची तपासणी करून एसबीजी ब्रँडच्या रिफाइंड पामोलीन ऑईल या खाद्यतेलाचा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला. हा साठा संशयास्पद आढळल्याने २ लाख ४२ हजार ७४० रुपये किमतीचे १ हजार ४९८.४ किलो खाद्यतेल जप्त करण्यात आले.

अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार व सहआयुक्त श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ व नियम २०११ अंतर्गत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार, अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. पाटील व सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी या कारवाया केल्या आहेत.

नागरिकांना स्वच्छ व भेसळमुक्त अन्न उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हाभर ही मोहीम अधिक व्यापक स्वरूपात सुरू आहे. अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# रायतेवाडीचे सरपंच हरिभाऊ मंडलिक यांना मातृशोक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील रायतेवाडी ग्रामपंचायतचे सरपंच हरिभाऊ मारुती मंडलिक यांच्या मातोश्री तान्हाबाई मारुती मंडलीक यांचे सोमवारी १/६/२०२६ रोजी निधन झाले.

त्यांच्यावर प्रवरा तीरी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अठारा पगड संघटनेचे अध्यक्ष रमेश यशवंत गायकवाड, दूध संघाचे संचालक संतोष मांडेकर, शाम्प्रोचे संचालक तानाजी आहेर व विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या मागे पती, तीन मुले, चार मुली, नातं सुन आदी मोठा परिवार असुन त्यांचे निधनाने रायतेवाडी गावात हाळहाळ व्यक्त होत आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. तान्हाबाई मंडलिक यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# कर्जमाफीचा लाभ मिळवण्यासाठी आधी अतिरिक्त थकबाकी भरा

## २०१९ च्या लाभार्थींना फक्त ५० हजारांचीच सवलत

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : राज्य सरकारने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' मंजूर करून दोन लाख रुपयांपर्यंतच्या थकीत पीककर्जाची माफी जाहीर केली असली, तरी या योजनेतील काही अटींमुळे अनेक शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषत: २०१९ मधील कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना यावेळी केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच सवलत मिळणार असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आली. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने त्यासंदर्भातील शासन आदेशही जारी केला आहे. मात्र, २०१९ मधील महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा दोन लाख रुपयांची कर्जमाफी मिळणार नसून त्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंतचा लाभ दिला जाणार आहे.

खरीप हंगामाच्या तोंडावर सरकारने कर्जमाफीची घोषणा केली असली, तरी दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना प्रथम अतिरिक्त थकबाकी स्वत: भरावी लागणार आहे. त्यानंतरच त्यांना एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी मिळेल. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर अतिरिक्त रक्कम भरायची की खरीप हंगामासाठी भांडवल उभे करायचे, असा पेच निर्माण झाला आहे.

योजनेनुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत घेतलेले पीककर्ज, जे नोव्हेंबर २०२५ रोजी थकीत होते आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत ज्याची परतफेड झालेली नव्हती, अशा कर्जदारांना लाभ मिळणार आहे. मात्र, मुद्दल व व्याजासह थकीत रक्कम दोन लाखांपेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त रक्कम प्रथम बँकेत जमा करणे बंधनकारक राहणार आहे.


अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जिल्ह्यातील सुमारे २ लाख ७४ हजार थकीत कर्जदार शेतकऱ्यांची यादी शासनाकडे सादर केली आहे. या यादीचे लेखापरीक्षण करण्यात येणार असून त्यासाठी नाशिक येथे संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. लेखापरीक्षणानंतर पात्र शेतकऱ्यांची यादी पोर्टलवर प्रसिद्ध केली जाईल. पात्र शेतकऱ्यांनी उर्वरित कर्जाची परतफेड केल्यानंतर त्यांच्या जमिनीवरील कर्जाचा बोजा हटवून सातबारा कोरा करण्यात येणार आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील तब्बल ६ लाख १ हजार १४० शेतकऱ्यांनी नियमित कर्जफेड केली असून ते शासनाच्या प्रोत्साहन अनुदान योजनेस पात्र ठरणार आहेत. अशा शेतकऱ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे. मात्र, यापूर्वीच्या कर्जमाफी योजनेत जाहीर करण्यात आलेले प्रोत्साहन अनुदान अद्याप अनेक शेतकऱ्यांना मिळालेले नसल्याने नव्या घोषणेबाबतही शेतकरी साशंक आहेत.


Happy Birthday



मा. सुदिप वाकळे
चेअरमन, साईनाथ उद्योग समुहाचे



डॉ. विक्रम पानसरे
गुरुप्रसाद जनरल हॉस्पिटल, घुलेवाडी



मा. सागर हासे
प्रसिद्ध टॅक्स कन्सल्टंट



मा. प्रकाश कोटकर
अध्यक्ष, स्वराज्य सैनिक संघटना



मा. योगेश गुंजाळ
युवा उद्योजक

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

# अल निनो सक्रिय होण्याची शक्यता

मुंबई (वृत्तसंस्था)

भारतीय हवामान विभागापाठोपाठ जागतिक हवामानशास्त्र संघटना (थचज) ने देखील जागतिक हवामानाबाबत इशारा जारी केला आहे. संयुक्त राष्ट्र च्या या हवामान संस्थेनुसार, पॅसिफिक महासागरातील समुद्राचे पाणी वेगाने गरम होत असल्यामुळे जून ते ऑगस्टदरम्यान अल निनो तयार होण्याची शक्यता ८०% आहे.

नोव्हेंबरपर्यंत ते ९०% किंवा त्याहून अधिक राहण्याची शक्यता आहे. अल निनो पुढे जाऊन आणखी मजबूत होऊ शकतो. यामुळे भारतासह जगभरात दुष्काळ, पूर, सागरी-भूभागावरील उष्णतेची लाट आणि हवामानाची धोकादायक रूपे पाहायला मिळू शकतात. कृषी मंत्रालयाने राज्ये आणि संबंधित एजन्सींना निर्देश दिले आहेत की, सामान्यपेक्षा कमी मान्सून आणि अल निनोच्या शक्यतेमुळे जिल्हा स्तरावर योजना लागू कराव्यात. कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, त्याचबरोबर शेतकऱ्यांपर्यंत लवकर माहिती पोहोचवण्यासाठी डिजिटल आणि कॉल सेंटर सेवा मजबूत कराव्यात. प्रशांत महासागराच्या विषुववृत्तीय प्रदेशात जेव्हा समुद्रावरील वारे कमकुवत होतात, तेव्हा दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यावरील पाणी असामान्यपणे गरम होऊ लागते. समुद्राचे पाणी गरम होण्याला अल निनो म्हणतात. हे जागतिक वारे आणि ढगांचे नमुने बदलून जगभरातील हवामानाला विस्कळीत करते.


**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर
- संपर्क - 9822258458

**स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत**
अकाऊंटंट मॅनेजर
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॉर्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क - सांगळे साहेब - 9850194463 9503947084

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर
श्री गणेश टायर्स
या फॉर्मसाठी
सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1
कामाचा अनुभव आवश्यक
9423793758

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME IS
MOHAMMED TALHA ELAHIBAKSH PATHAN
TO NEW NAME AS
MOHOMMAD TALHA ELAHIBAKSHA PATHAN,
UIDAI 7357 1147 2581
ADRESS-457 OPP MAHADEV SAW MILL,PUNA ROAD SANGAMNER 422605

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME IS
SOFIYAN ARIF SHAIKH
TO NEW NAME AS
SUFIYAN ARIF SHAIKH
UIDAI 748120970805
ADRESS-MOGALPURA SANGAMNER 422605

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SHABANA PEER MOHAMMED SHAIKH
NEW NAME AS
SHABANA AKHTAR SHAIKH
ADD - KHAN SAHEB WADA, NAIKWADPURA ,SANGAMNER TAL- SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**नावात बदल**
माझे जुने नाव नवनाथ संपत भोर असे होते ते आता बदलनू नवीन नाव प्रजित संपत भोर असे झाले आहे तरी वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे.
पत्ता - मु. आंबड, पो. धामणगाव आवारी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

**पाहिजेत**
संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.
टू व्हिलर आवश्यक
9423793758

**पाहिजेत**
मे. संदीप महाले ज्वेलर्ससाठी
दागिन्यांच्या बिलिंगसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत
- संपर्क-
मे. संदीप बबन महाले ज्वेलर्स बाजारपेठ, संगमनेर, जि. अ.नगर
8698305864

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**पाहिजेत**
होलसेल मेडीकल दुकान कामासाठी मुले पाहिजेत
इंग्रजीचे ज्ञान आवश्यक
आकर्षक पगार
संपर्क- ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
9730042410

**कामगार भरती**
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

**जागा भाड्याने देणे**
३ मजली
८०० स्केफूट
ठिकाण - मोमीनपुरा चौक,फेमस शुज समोर, संगमनेर
9028342110

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ऑसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६







# तुकाराम मुंढे यांचा धडाका की व्यवस्थेच्या अपयशाचा आरसा

## सात दिवसांत जे सापडले, ते इतकी वर्षे कुणालाच का सापडले नाही?

महाराष्ट्रात पुन्हा एकदा एक नाव चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे 'तुकाराम मुंढे'. गेली अनेक वर्षे प्रशासनात काम करत असताना त्यांनी जिथे जिथे जबाबदारी स्वीकारली, तिथे तिथे त्यांनी कामाच्या पद्धतीमुळे आणि निर्णयक्षमतेमुळे स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यामुळे त्यांची कोणत्याही विभागात नियुक्ती झाली की सामान्य नागरिकांच्या अपेक्षा वाढतात. यावेळीही तसेच झाले. अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांत राज्यभर धडक कारवाया सुरू झाल्या आणि पुन्हा एकदा महाराष्ट्रात प्रशासन, भेसळ आणि उत्तरदायित्व यांवर चर्चा सुरू झाली.

२५ मे ते ३१ मे २०२६ या अवघ्या सात दिवसांच्या कालावधीत अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर विशेष मोहीम राबवली. प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू, भेसळयुक्त अन्नपदार्थ, निकृष्ट दर्जाचे खाद्य उत्पादन, अस्वच्छ अन्न व्यवसाय आणि नियमभंग करणाऱ्या आस्थापनांवर कारवाया करण्यात आल्या. या मोहिमेत तब्बल २०३ आस्थापनांवर कारवाई झाली. १३० आस्थापनांवर छापे टाकण्यात आले. १०२ व्यक्तींना अटक करण्यात आली. ७२ एफआयआर दाखल झाले. ८६ आस्थापना सील करण्यात आल्या. एक कोटी अठ्ठावन्न लाख अठ्ठावीस हजार सहाशे सत्याहत्तर रुपयांचा माल जप्त करण्यात आला. ही आकडेवारी केवळ सरकारी अहवालातील संख्या नाही. या प्रत्येक आकड्यामागे नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित एक गंभीर वास्तव दडलेले आहे.

कोकण विभागात ४७ आस्थापनांवर कारवाई झाली, ४६ जणांना अटक झाली आणि ३९ आस्थापना सील करण्यात आल्या. पुणे विभागात १४ कारवाया, १३ अटक आणि १३ आस्थापना सील करण्यात आल्या. नाशिक विभागात कारवाया झाल्या, वाहन जप्त झाले. छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती आणि बृहन्मुंबई विभागातही मोठ्या प्रमाणावर धाडी पडल्या. याचा अर्थ हा प्रश्न एखाद्या एका शहरापुरता किंवा एका जिल्ह्यापुरता मर्यादित नाही. तो संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेला आहे.

**पण या आकडेवारीपेक्षाही मोठा प्रश्न आहे - हे सर्व आजच सुरू झाले होते का?**

जर एका आठवड्यात एवढ्या मोठ्या प्रमाणावर कारवाया होऊ शकतात, एवढा मोठा साठा जप्त होऊ शकतो, एवढ्या मोठ्या प्रमाणात अटक होऊ शकतात, तर या कारवायांमध्ये सापडलेले उद्योग गेल्या काही वर्षांपासून कुठे होते? ते अचानक उभे राहिले होते का? की ते अनेक वर्षांपासून सुरू होते? जर ते सुरू होते, तर ते प्रशासनाच्या नजरेस का पडले नाहीत?

**हा प्रश्न केवळ एका विभागाला नाही. हा प्रश्न संपूर्ण व्यवस्थेला आहे.**

गुटखा तयार करणारा कारखाना एका दिवसात उभा राहत नाही. भेसळयुक्त दूध तयार करणारी साखळी एका रात्रीत तयार होत नाही. निकृष्ट तूप, बनावट मसाले, रासायनिक प्रक्रियेद्वारे पिकवलेली फळे किंवा संशयास्पद खाद्यपदार्थ यासाठी उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीचे जाळे उभे करावे लागते. या प्रक्रियेत अनेक लोक, अनेक स्तर आणि अनेक यंत्रणा येतात. मग हे सर्व इतकी वर्षे सुरू राहते आणि कोणाच्याही लक्षात येत नाही, हे मानणे कठीण आहे.

**प्रत्येक विभागात तुकाराम मुंढे यांच्यासारखाच अधिकारी का लागतो?**

खरे तर तुकाराम मुंढे यांचे वैशिष्ट्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वात नाही, तर त्यांच्या कार्यपद्धतीत आहे. ते ज्या खात्यात जातात, तिथे सर्वप्रथम फाईल आणि वास्तव यांच्यातील अंतर तपासतात. कागदावर सर्व काही व्यवस्थित असू शकते. अहवाल पूर्ण असू शकतात. तपासण्यांच्या नोंदी असू शकतात. पण प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असू शकते. अनेकदा प्रशासनाची सर्वात मोठी शोकांतिका ही असते की अहवाल व्यवस्थित असतात, पण वास्तव अस्वस्थ करणारे असते.

तुकाराम मुंढे यांची कारकीर्द पाहिली तर हे वारंवार दिसते. त्यांनी महसूल, परिवहन, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका आणि विविध प्रशासकीय जबाबदाऱ्यांमध्ये काम केले. प्रत्येक ठिकाणी त्यांनी उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर दिला. त्यामुळे त्यांच्याभोवती अनेकदा वाद निर्माण झाले. कारण नियमांचे पालन करायला लावणे हे सर्वांना सोयीचे नसते.

याच ठिकाणी महाराष्ट्रातील सामान्य नागरिकांच्या मनात एक प्रश्न निर्माण होतो - महाराष्ट्राला प्रत्येक विभागात तुकाराम मुंढे यांच्यासारखाच अधिकारी का लागतो?

एखाद्या शहरात शिस्त आणण्यासाठी, एखाद्या विभागात कारवाई सुरू करण्यासाठी किंवा एखाद्या यंत्रणेला जागे करण्यासाठी प्रत्येक वेळी एखाद्या विशिष्ट अधिकाऱ्याची गरज का भासते? हा प्रश्न व्यक्तीचा नाही. हा प्रश्न व्यवस्थेच्या संस्कृतीचा आहे.

कारण एखादा अधिकारी प्रामाणिक असणे ही बातमी नसावी. नियमांचे पालन होणे ही बातमी नसावी. ते प्रशासनाचे सामान्य स्वरूप असले पाहिजे. पण आज परिस्थिती अशी झाली आहे की नियमांचे काटेकोर पालन करणारा अधिकारी अपवाद वाटतो. आणि हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे.

संगमनेर, राहुरी, नेवासा आणि संपूर्ण नगर जिल्ह्याच्या संदर्भात हा विषय अधिक गंभीर ठरतो. हा भाग कृषी, दुग्धव्यवसाय, खाद्यप्रक्रिया उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. हजारो प्रामाणिक उद्योजक येथे काम करतात. लाखो ग्राहक या उत्पादनांवर अवलंबून आहेत. पण त्याचवेळी वर्षानुवर्षे भेसळ, निकृष्ट दर्जाचे पदार्थ, संशयास्पद उत्पादन आणि अन्नसुरक्षेबाबतच्या चर्चा समाजात सुरू असतात.

चहाच्या टपरीवर चर्चा असते. बाजारपेठेत चर्चा असते. गावात चर्चा असते. पण अनेकदा ती चर्चा तक्रारीपर्यंत पोहोचत नाही. आणि तक्रार पोहोचली तरी ती कारवाईपर्यंत पोहोचत नाही. हीच जागा चुकीच्या प्रवृत्तींना वाढण्यासाठी पोषक ठरते.

भेसळ हा साधा आर्थिक गुन्हा नाही. तो आरोग्यावरचा हल्ला आहे. दुधात पाणी मिसळले तर ग्राहक लगेच मरत नाही. तुपात निकृष्ट तेल मिसळले तर लगेच रुग्णालयात जावे लागत नाही. मसाल्यात भेसळ केली तर दुसऱ्या दिवशी परिणाम दिसत नाही. पण वर्षानुवर्षे शरीरात जाणारे हे पदार्थ आरोग्याची हानी करत राहतात. किडनीचे आजार, यकृताचे विकार, हार्मोनल समस्या, पचनाचे त्रास आणि गंभीर आजारांच्या पार्श्वभूमीवर अन्नसुरक्षेचा प्रश्न हा केवळ व्यापाराचा प्रश्न राहत नाही. तो सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न बनतो.

यामुळेच अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेली सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र ही संकल्पना महत्त्वाची ठरते. नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्न मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे. त्यांनी प्रतिबंधित पदार्थांचे उत्पादन, साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांवर यापुढे आणखी कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. हा इशारा केवळ व्यवसायिकांसाठी नाही, तर संपूर्ण यंत्रणेसाठी आहे.

या मोहिमेतील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे नागरिकांचा सहभाग. अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत शंका असल्यास नागरिकांनी तक्रार करावी, असे प्रशासनाने आवाहन केले आहे. यासाठी स्वतंत्र तक्रार नोंदणी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ आणि ई-मेलद्वारे तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. पण प्रश्न पुन्हा तोच आहे - नागरिकांनी तक्रार करायची, प्रशासनाने धाड टाकायची, माल जप्त करायचा आणि काही महिन्यांनी पुन्हा तीच परिस्थिती निर्माण व्हायची का? की यावेळी काही मूलभूत बदल घडणार आहेत?

व्यवस्था एका दिवसात पोखरली जात नाही. ती हळूहळू कमकुवत होते. जेव्हा नियम मोडले जातात आणि कोणी विचारत नाही. जेव्हा तपासण्या फक्त कागदावर होतात. जेव्हा नमुन्यांचे अहवाल फाईलमध्ये बंद होतात. जेव्हा दंड हा व्यवसायाचा खर्च बनतो. जेव्हा कारवाईची भीती संपते. तेव्हा व्यवस्था आतून रिकामी होऊ लागते.

आज तुकाराम मुंढे चर्चेत आहेत. उद्या दुसरे अधिकारी असतील. पण महाराष्ट्राचे आरोग्य, महाराष्ट्रातील ग्राहकांची सुरक्षा आणि अन्नसाखळीची शुद्धता एखाद्या एका अधिकाऱ्यावर अवलंबून राहू शकत नाही. प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक तालुक्यात, प्रत्येक तपासणी कार्यालयात आणि प्रत्येक विभागात नियमांचे पालन करणारी कार्यसंस्कृती निर्माण झाली पाहिजे.

कारण समाजाला नायकांची गरज नसते. समाजाला सक्षम व्यवस्थेची गरज असते.

आज धाडी पडत आहेत. अटक होत आहेत. माल जप्त होत आहे. आस्थापना सील होत आहेत. पण सर्वात मोठी कारवाई अजून बाकी आहे. ती म्हणजे आत्मपरीक्षणाची.

कारण प्रश्न गुटख्याचा नाही. प्रश्न पानमसाल्याचा नाही. प्रश्न तुपाचा, दुधाचा किंवा मसाल्याचा नाही.

प्रश्न इतकाच आहे की नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये इतकी वर्षे निष्काळजीपणा का चालला?

आणि जोपर्यंत या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर मिळत नाही, तोपर्यंत महाराष्ट्रातील प्रत्येक जागरूक नागरिकाच्या मनात एकच प्रश्न घुमत राहील. तुकाराम मुंढे यांना सात दिवसांत जे सापडले, ते इतकी वर्षे कुणालाच का सापडले नाही? या प्रश्नाचे उत्तर शोधणे हीच खरी कारवाई ठरेल. बाकीच्या धाडी तर फक्त सुरुवात आहे.




**प्रतिबंधित अन्नपदार्थ -गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू इ. (कालावधी - २५ मे २०२६ ते ३१ मे २०२६)**

| विभाग | अन्न सुरक्षा अधिकारी | तपासणी केलेल्या आस्थापना | प्रतिबंधित पदार्थ आढळलेल्या | जप्त साठा किंमत | FIR | अटक | सील आस्थापना | जप्त वाहने | वाहन किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | 37 | 22 | 22 | 123952 | 16 | 23 | 22 | 0 | 0 |
| कोकण | 54 | 47 | 47 | 1134351 | 24 | 46 | 39 | 2 | 340000 |
| पुणे | 71 | 14 | 14 | 977994 | 14 | 13 | 13 | 5 | 660000 |
| नाशिक | 33 | 5 | 5 | 457657 | 5 | 5 | 3 | 1 | 150000 |
| छत्रपती संभाजीनगर | 34 | 12 | 8 | 358961 | 6 | 8 | 5 | 0 | 0 |
| नागपूर | 27 | 3 | 2 | 273001 | 2 | 2 | 1 | 0 | 0 |
| अमरावती | 16 | 27 | 5 | 79132 | 5 | 5 | 3 | 1 | 40000 |
| एकूण | 272 | 130 | 103 | 3405048 | 72 | 102 | 86 | 9 | 1190000 |

| अ. क्र. | विभाग | आस्थापनांची संख्या | किंमत | जप्त साठा (किलो) |
|---|---|---|---|---|
| 1 | बृहन्मुंबई | 6 | 319078 | 2047.4 |
| 2 | कोकण | 14 | 2729073 | 25729 |
| 3 | पुणे | 15 | 3406716 | 50228 |
| 4 | नाशिक | 12 | [illegible] | [illegible] |
| 5 | छत्रपती संभाजीनगर | 13 | 401852 | 3592 |
| 6 | नागपूर | 6 | [illegible] | [illegible] |
| 7 | अमरावती | 7 | 75550 | 743 |
| | महाराष्ट्र | 73 | [illegible] | [illegible] |

युवावार्ता पंचनामा

अन्नपदार्थ दर्जासंदर्भात तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५

# सीबीएसईमध्ये मोठी उलथापालथ; ओएसएम घोटाळा

# उत्तरपत्रिका गोंधळ आणि अध्यक्षांची उचलबांगडी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) सध्या आपल्या इतिहासातील सर्वात मोठ्या प्रशासकीय वादांपैकी एका वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. इयत्ता बारावीच्या डिजिटल मूल्यमापन प्रक्रियेत वापरण्यात आलेल्या 'ऑन-स्क्रीन मार्किंग' (OSM) प्रणालीतील कथित अनियमितता, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांबाबत समोर आलेल्या गंभीर तक्रारी आणि पुनर्मूल्यांकन प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी यांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने थेट सीबीएसईच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांवर कारवाई करत अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांची तडकाफडकी उचलबांगडी केली आहे.

या प्रकरणामुळे देशभरातील लाखो विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये चिंता निर्माण झाली असून, सीबीएसईच्या डिजिटल मूल्यमापन प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची अदलाबदल झाल्याचा संशय, पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नसलेल्या उत्तरपत्रिका मिळाल्याचे आरोप आणि ऑनलाईन प्रक्रियेमध्ये आलेल्या तांत्रिक त्रुटींमुळे हा वाद अधिकच गडद झाला आहे.

सीबीएसईने यंदा प्रथमच मोठ्या प्रमाणावर 'ऑन-स्क्रीन मार्किंग' प्रणालीचा वापर केला होता. या प्रणालीअंतर्गत उत्तरपत्रिका स्कॅन करून डिजिटल स्वरूपात परीक्षकांकडे पाठवल्या जातात. मात्र काही विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनासाठी उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रती मागवल्यानंतर धक्कादायक बाबी समोर आल्या. वेदांत नावाच्या विद्यार्थ्याने त्याला मिळालेली भौतिकशास्त्राची उत्तरपत्रिका त्याची नसल्याचा दावा केला. त्यानंतर संजना नावाच्या विद्यार्थिनीनेही रसायनशास्त्राच्या उत्तरपत्रिकेतील पहिले पान तिचे असले तरी उर्वरित पाने दुसऱ्या कोणाच्या हस्ताक्षरातील असल्याचा आरोप केला. दोघांनीही सोशल मीडियावर पुरावे सादर केल्यानंतर या प्रकरणाने मोठे स्वरूप धारण केले.

विद्यार्थ्यांच्या या तक्रारींमुळे उत्तरपत्रिकांची अदलाबदल झाली का, स्कॅनिंग प्रक्रियेत त्रुटी होत्या का, की डिजिटल मूल्यांकन प्रणालीमध्ये गंभीर तांत्रिक दोष आहेत, याबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले. याच काळात पुनर्मूल्यांकन पोर्टलमध्ये अडचणी, शुल्क भरण्याच्या प्रक्रियेत अडथळे आणि अर्ज प्रक्रियेत विलंब याबाबतही तक्रारी वाढल्या. परिणामी सीबीएसईवर चौफेर टीका होऊ लागली.

या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप केला. सीबीएसई अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांची बदली करण्यात आली. त्यांच्या जागी गृह मंत्रालयातील अतिरिक्त सचिव प्रशांत सीताराम लोखंडे यांची सीबीएसई अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून वरुण भारद्वाज यांच्याकडे सचिवपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. याशिवाय, OSM प्रणालीच्या खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी क्षमता विकास आयोगाच्या अध्यक्षा एस. राधा चौहान यांच्या नेतृत्वाखाली एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, चौकशी समिती OSM प्रणालीची खरेदी प्रक्रिया, निविदा प्रक्रिया, तांत्रिक पात्रता, सॉफ्टवेअरची कार्यक्षमता, स्कॅनिंग प्रक्रिया आणि उत्तरपत्रिकांच्या व्यवस्थापनातील संभाव्य त्रुटींचा सखोल अभ्यास करणार आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर आणखी प्रशासकीय कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या तक्रारींची दखल घेत सीबीएसईने पुनर्मूल्यांकन आणि पडताळणीसाठी विशेष ऑनलाइन पोर्टल सुरू केले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रती प्राप्त केल्या आहेत त्यांनाच ही सुविधा उपलब्ध आहे. या पोर्टलद्वारे उत्तरपत्रिकेतील गहाळ पाने, अतिरिक्त उत्तरपत्रिका नसणे, नकाशे किंवा आलेख गहाळ असणे, अस्पष्ट स्कॅन प्रत, तसेच चुकीच्या उत्तरपत्रिकेचे मूल्यमापन यांसारख्या त्रुटींबाबत विद्यार्थी तक्रार करू शकतात.

पुनर्मूल्यांकन प्रक्रियेसाठी सीबीएसईने विशिष्ट शुल्क निश्चित केले आहे. उत्तरपत्रिकेतील त्रुटींच्या पडताळणीसाठी प्रति उत्तरपत्रिका १०० रुपये तर उत्तरांच्या पुनर्मूल्यांकनासाठी प्रति प्रश्न २५ रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन असून यूपीआय, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंगद्वारे शुल्क भरावे लागणार आहे. या संपूर्ण घडामोडींमुळे सीबीएसईच्या डिजिटल मूल्यमापन प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण झाले असले तरी, सरकारने थेट सर्वोच्च अधिकाऱ्यांवर कारवाई करून कठोर संदेश दिला आहे. आता चौकशी समितीचा अहवाल, विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण आणि नव्या नेतृत्वाखाली सीबीएसईची पुढील कार्यपद्धती याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

### एका नजरेत संपूर्ण प्रकरण

- बारावीच्या डिजिटल मूल्यमापन प्रक्रियेत अनियमिततेचे आरोप
- काही विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिका स्वतःच्या नसल्याचा दावा केला
- OSM (On-Screen Marking) प्रणालीवर प्रश्नचिन्ह
- पुनर्मूल्यांकन पोर्टलमध्ये तांत्रिक अडचणी
- अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांची उचलबांगडी
- प्रशांत सीताराम लोखंडे यांची नव्या अध्यक्षपदी नियुक्ती
- वरुण भारद्वाज यांची सचिवपदी नियुक्ती
- एस. राधा चौहान यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती
- IIT मद्रास आणि IIT कानपूरच्या तज्ज्ञांची तांत्रिक मदत
- विद्यार्थ्यांसाठी विशेष पुनर्मूल्यांकन पोर्टल सुरू

### सीबीएसई वादाची घटनाक्रमवार मांडणी

- बारावीच्या परीक्षा उत्तरपत्रिकांचे OSM प्रणालीद्वारे डिजिटल मूल्यमापन
- निकाल जाहीर झाल्यानंतर काही विद्यार्थ्यांना अपेक्षेपेक्षा कमी गुण
- विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केले
- स्कॅन उत्तरपत्रिका मिळाल्यानंतर उत्तरपत्रिका अदलाबदल झाल्याचे आरोप
- सोशल मीडियावर विद्यार्थ्यांचे दावे व्हायरल
- पुनर्मूल्यांकन पोर्टल आणि डिजिटल प्रक्रियेवर प्रश्न
- केंद्र सरकारची हस्तक्षेपात्मक भूमिका
- सीबीएसई अध्यक्ष व सचिव यांची बदली
- चौकशी समितीची नियुक्ती
- नव्या अध्यक्ष व सचिवांची नियुक्ती
- पुनर्मूल्यांकनासाठी स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल सुरू

## CBSE चा नवा मराठमोळा अध्यक्ष



**प्रशांत सीताराम लोखंडे (IAS)**

ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणालीवरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महत्त्वाचा प्रशासकीय निर्णय घेत मंगळवारी आयएएस अधिकारी प्रशांत लोखंडे यांची सीबीएसईच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. त्यांनी राहुल सिंह यांची जागा घेतली असून, त्याच दिवशी राहुल सिंह आणि सीबीएसईचे सचिव हिमांशू गुप्ता यांची बदली करण्यात आली.

प्रशांत सीताराम लोखंडे हे २००१ बॅचचे एजीएमयूटी (अरुणाचल प्रदेश, गोवा, मिझोराम आणि केंद्रशासित प्रदेश, कॅडरचे वरिष्ठ भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. प्रशासनातील दीर्घ अनुभव असलेल्या लोखंडे यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले असून, नियुक्तीपूर्वी ते केंद्रीय गृह मंत्रालयात अतिरिक्त सचिव म्हणून कार्यरत होते. केंद्र सरकारच्या विविध धोरणांच्या अमलबजावणीत आणि प्रशासकीय निर्णय प्रक्रियेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

प्रशांत लोखंडे यांनी मॅकेनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण पुणे विद्यापीठातून घेतले. तर इंडस्ट्रियल इंजिनिअरिंगमधील पदव्युत्तर पदविकेचे शिक्षण मुंबई येथून केले. त्यांनी केंद्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. ठाणे महापालिकेच्या सी.डी. देशमुख प्रशिक्षण संस्थेचे ते माजी विद्यार्थी होते.

ठाणे महापालिका संचलित के. चिंतामणराव देशमुख प्रशासकीय संस्था ही यूपीएससी आणि एमपीएससी स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण देणारी राज्यातील एक महत्त्वाची संस्था मानली जाते. या संस्थेतून यापूर्वीही अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन करून विविध प्रशासकीय सेवांमध्ये उच्च पदे मिळवली आहेत. प्रशासकीय सेवांमध्ये महाराष्ट्रातील मराठी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. सध्या विद्यार्थ्यांना दरमहा तीन हजार रुपयांचे विद्यावेतन (स्टायपेंड), वसतिगृहाची सुविधा आणि स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक सर्वांगीण मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. देशातील महापालिकांमध्ये अशा प्रकारचे दर्जेदार प्रशिक्षण देणाऱ्या मोजक्या संस्थांपैकी ही एक संस्था आहे





दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com










# शिक्षण, समाजकारण आणि जनसेवेची दखल

## डॉ. सुधीर तांबे यांना साने गुरुजी जीवनगौरव पुरस्कार जाहीर



युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर -पुरोगामी विचारांचे पाईक, जयहिंद लोक चळवळीचे संस्थापक तथा नाशिक पदवीधर मतदार संघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांना राष्ट्रसेवा दलाच्या वतीने दिला जाणारा साने गुरुजी जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

मा. आ. डॉ. सुधीर तांबे हे संगमनेरमधील एम. एस. सर्जन असून शहरातील जनतेच्या आग्रस्त वैद्यकीय क्षेत्राबरोबर संगमनेरच्या नगराध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळताना नगरपालिकेला दिशा दिली. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श विचारांवर लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संगमनेरच्या सहकार, समाजकारण, राजकारण, शिक्षण, क्षेत्रामध्ये योगदान दिले. निरोगी समाज निर्मितीसाठी जयहिंद युवा मंच ची स्थापना करून तरुणांना संघटित केले. पुरोगामी विचारांच्या प्रचारासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवले. मतिमंद व मूकबधिर विद्यालयांसाठी संग्राम मतिमंद विद्यालयाच्या माध्यमातून मोठे कार्य उभे केले.

सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कामाची दखल घेत उत्तर महाराष्ट्राच्या नागरिकांच्या मागणीवरून पदवीधरच्या निवडणुकीमध्ये सलग तीन वेळेस मोठ्या विक्रमी मताधिक्याने विजय मिळवला. विधान परिषदेमध्ये शिक्षण, कृषी सहकार, वकील, डॉक्टर, बेरोजगार, पदवीधर युवकांसाठी सातत्याने विविध प्रश्न मांडले. अहिल्यानगर, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार या पाच जिल्ह्यातील ५४ तालुके विविध गावे यामध्ये सातत्याने त्यांनी संपर्क ठेवला. सहज उपलब्धता, सहज संपर्क आणि प्रत्येक प्रश्नांसाठी असलेला मोठा पाठपुरावा यातून मोठा जनसंपर्क निर्माण झाला. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी ५ वर्षामध्ये सुमारे नऊ लाख किलोमीटरचा प्रवास केला. नेता नवे मित्र अशी त्यांची महाराष्ट्रामध्ये मोठी ओळख निर्माण झाली आहे. आदिवासी, गोरगरीब बांधव यांच्या प्रति असलेली तळमळ, सातत्याने विज्ञानवादी विचारांचा ध्यास, साहित्य, समाजकारण, शिक्षण क्षेत्रात सततचे काम हे त्यांचे वैशिष्ट्य राहिले आहे. राष्ट्रसेवा दलाच्या वतीने त्यांना अत्यंत मानाचा साने गुरुजी जीवनगौरव पुरस्कार ४ जून २०२६ रोजी पुणे येथील शानदार कार्यक्रमात दिला जाणार आहे.

मा. आमदार डॉ. सुधीर तांबे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, ॲड. माधवराव कानवडे, बाबासाहेब ओहोळ, रणजीत सिंह देशमुख, सौ. दुर्गाताई तांबे, डॉ जयश्रीताई थोरात, इंद्रजीत भाऊ थोरात, सुधाकर जोशी, शंकरराव खेमनर, बाजीराव पाटील खेमनर, संपतराव डोंगरे, हौशीराम सोनवणे, रामहरी कातोरे, राजेंद्र कडलग, राजेंद्र गुंजाळ, विश्वासराव मुर्तडक, डॉ. मैथिलीताई तांबे, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे, दिलीपराव पुंड, नूर मोहम्मद शेख, प्रा.हिरालाल पगडाल, सुरेश झावरे यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# गुंजाळवाडीत सप्ताहाची तयारी अंतिम टप्प्यात

## भक्ती, संस्कार आणि कृषी विकासाची सर्वसमावेशक महापर्वणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अधिकमासातील अखंड हरिनाम सप्ताहाच्या आठव्या पर्वाचा जयघोष पंचक्रोशीत घुमू लागला असून गुंजाळवाडी येथे होणाऱ्या या भव्य धार्मिक व सामाजिक सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. भक्ती, अध्यात्म, संस्कार, कृषी, ज्ञान आणि समाजप्रबोधनाचा संगम घडविणाऱ्या या सप्ताहाबाबत ग्रामस्थांसह भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

विश्वगौरव विभूषित महायोगी प.पू. गगनगिरी महाराज यांच्या प्रेरणेतून सुरू झालेली ही परंपरा यंदा ८ ते १५ जून दरम्यान राजापूर रोडवरील जयवंतराव व बाळासाहेब गुंजाळ पाटील, गुंजाळवाडी मळा येथे पार पडणार आहे. सप्ताह समिती, गगनगिरी महाराज भक्त परिवार आणि ग्रामस्थांच्या सामूहिक प्रयत्नांतून हा सोहळा साकारला जात असून हजारो भाविकांच्या उपस्थितीने परिसर भक्तिमय वातावरणाने नटणार आहे.

सप्ताहादरम्यान हरिनाम, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, कीर्तन, श्रीराम कथा आणि समाजप्रबोधनपर व्याख्यानांची मेजवानी भाविकांना लाभणार आहे. महंत ह.भ.प. रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांची श्रीराम कथा दररोज सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत होणार आहे.

यंदाच्या सप्ताहाचे विशेष आकर्षण म्हणून बुधवार, दि. १० जून रोजी सकाळी ९ वाजता सनातन धर्माचे अध्वर्यू आद्य शंकराचार्य यांच्या पादुकांचे दर्शन भाविकांना घेता येणार आहे.

समाजप्रबोधनाच्या दृष्टीने दररोज सकाळी ११ वाजता नंदकुमार पोवार, इंद्रजीत देशमुख, डॉ. संजय मालपाणी, भास्कर पेरे पाटील आणि शालिनीताई देशमुख-इंदुरीकर यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. तसेच दुपारी ३ वाजता ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, संजय महाराज पाचपोर, जयंत



महाराज पाटील, विशाल महाराज खोले, सोमनाथ महाराज सानप, उद्धव महाराज मंडलिक आणि निवृत्ती महाराज देशमुख-इंदुरीकर यांची कीर्तनसेवा होणार आहे.

सप्ताहासोबत आयोजित करण्यात आलेला ‘गगन भरारी कृषी महोत्सव’ हे आणखी एक प्रमुख आकर्षण ठरणार आहे. या महोत्सवात १०५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग राहणार असून ९ जून रोजी जगद्गुरू रामानंदाचार्य स्वामी नरेंद्र महाराज यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. आधुनिक शेती, तंत्रज्ञान आणि ग्रामीण विकासासंदर्भातील विविध माहिती या माध्यमातून शेतकऱ्यांना उपलब्ध होणार आहे.

याशिवाय प.पू. गगनगिरी महाराजांच्या पादुकांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून सप्ताहभर स्वामी गोविंदगिरीजी महाराज, आत्मामलिक माऊली परंपरेचे उत्तराधिकारी जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज (वेरूळ), विश्वचैतन्य सद्गुरू श्री नारायण महाराज, श्री टेंबे स्वामी आणि सद्गुरू रामगिरीजी महाराज यांच्या शांत दर्शनाचा लाभ भाविकांना घेता येणार आहे. सप्ताहाची सांगता रविवार, दि. १५ जून रोजी सकाळी १० वाजता ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख-इंदुरीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी समितीचे पदाधिकारी, स्वयंसेवक आणि हजारो भक्तगण अहोरात्र परिश्रम आहे.







# श्रीरामपूर हादरले, एटीएसकडून छापे

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - शहरात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) बुधवारी सकाळी मोठी आणि समन्वित कारवाई करत सात ते आठ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानस्थित गुन्हेगारी टोळ्यांशी संपर्क असल्याच्या संशयावरून चार जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांची सखोल चौकशी सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार, पाकिस्तानातील कथित गँगस्टर शैजाद भट्टी आणि राणा गटाशी संबंधित काही व्यक्तींशी श्रीरामपूरमधील काही तरुणांचा संपर्क असल्याची माहिती एटीएसला मिळाली होती. या माहितीच्या आधारेच शहरातील विविध भागांमध्ये ही छापेमारी करण्यात आली.

तपास यंत्रणांच्या प्राथमिक संशयानुसार, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून संपर्क साधून काही व्यक्तींनी स्थानिक स्तरावरील काही महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती गोळा करण्याचा तसेच त्यांच्या हालचालींबाबत माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच काही ठिकाणी रेकी झाल्याचा संशयही तपास यंत्रणांकडून व्यक्त करण्यात येत आहे.


दरम्यान, हिंदुत्ववादी कार्यकर्ते सागर बेग यांच्या निवासस्थानाची रेकी करून संबंधित माहिती परदेशातील नेटवर्कपर्यंत पोहोचविण्यात आल्याचा संशयही तपास यंत्रणांकडून तपासला जात आहे. मात्र या सर्व बाबींची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेले मोबाईल फोन, डिजिटल उपकरणे तसेच सोशल मीडिया व्यवहारांची सखोल तपासणी सुरू आहे. ताब्यात घेतलेल्या चौघांकडून एटीएसकडून कसून चौकशी केली जात असून, या प्रकरणात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांनी वर्तवली आहे.











दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25